# प्रेसनोट

जा.क्र. ७६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/११/२०१७

"पुरुष होमगार्डचे उजळणी प्रशिक्षण शिबीर समारोपण"

भंडारा :– दिनांक ०७/११/२०१७ ते १२/११/२०१७ पर्यत पोलीस मुख्यालय भंडारा येथे अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, जिल्हा समादेशक तथा पोलीस अधिक्षक भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली व केन्द्र नायक एस एस मिर्झा यांच्या नेतृत्वात पुरुष होमगार्डचे उजळणी प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन स. पो.नी. वर्मा व राखीव पोलीस उपनिरीक्षक प्रधान हजर होते.

प्रशिक्षण शिबीरात जिल्हयातुन एकुण ७० होमगार्ड हजर होते. शिबीरात होमगार्डना शारिरीक कवायत, पद कवायत, लाठी कवायत, अग्निशमन, विमोचन, प्रथमोपचार ईत्यादी प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

दिनांक १२/११/२०१७ रोजी शिबीराचे समारोप कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास मा. पोलीस उपधिक्षक (गृह) कुलकर्णी साहेब उपस्थित होते. त्यांनी होमगाडाना पॅरा पोलीस दल असे संबोधले असुन होमगार्ड ही संघटना मानवसेवी असुन त्याचे कर्तव्य पोलीसा सारखेच उच्च दर्जाचे असल्याचे म्हटले आहे.

प्रशिक्षण शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री. एस. एस. मिर्झा, केंन्द्रनायक श्री. पी. जी. वानखेडे सा. प्र. सुभेदार श्री. वैद्य व सौ. कविता गजभिये प्रशिक्षक यांनी परिश्रम घेतले आहे.

सदर कार्यक्रमाचे संचालन श्री. मिर्झा व आभार प्रदर्शन श्री. वानखेडे यांनी केले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.